# उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर वकिलांची न्यायालयनिहाय नेमणुक करण्यासाठी थेट मुलाखत झाल्यानंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी खालीलप्रमाणे आहे.**

## पात्र असलेल्या उमेदवारांची नावे

| अ.क्र. | वकिलाचे/ अभिवक्ताचे नाव | अ.क्र. | वकिलाचे/ अभिवक्ताचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दिपा चंद्रशेखर तिवारी | २१ | निखिलेश दिलीप पोटे |
| २ | कविता नारायणराव सोळुंखे | २२ | विनोद मोहनसिंग राजपुत |
| ३ | लतिका रुपक बेलडींगे-चित्रे | २३ | रोहीत प्रमोद सखदेव |
| ४ | हर्षद विलास भडभडे | २४ | शशीकला एकनाथ भोईर |
| ५ | विदयाधर विनायक गांगुर्डे | २५ | पवन गोपीचंद रोहरा |
| ६ | मेनन प्रियंका रेजिल | २६ | ज्योती श्रीचंद डावरा |
| ७ | महिंद्र बाळासाहेब देशमुख | २७ | शलाका विजय आहीरे |
| ८ | चंद्रशेखर साहेबराव पाटील | २८ | शैलेश अर्जुन चव्हाण |
| ९ | सविता मारूती कबडे | २९ | प्रविण शिवराम दिनकर |
| १० | उज्ज्वला सुरज सावंत | ३० | विशाल अनिल गायकवाड |
| ११ | तेजु पदमसिंग राठोड | ३१ | रोहीदास दर्याप्पा वाघमारे |
| १२ | गिरिश जवाहरलाल परयानी | ३२ | योगेश विजय पाटील |
| १३ | सागर गणपत तळेकर | ३३ | भावेश विष्णु मगम |
| १४ | स्मिता हेमंत गोरे | ३४ | संदीप शंकर गुंजाळ |
| १५ | विकास पुंडलिक जाधव | ३५ | दिया नीरज खिलनानी |
| १६ | संदीप धुडकु पगारे | ३६ | हरेश गोपीचंद पंजानी |
| १७ | दत्ता श्रीरंग माने | ३७ | सुधांशु शशीकुमार चौधरी |
| १८ | रविंद्र सर्जेराव गायकवाड | ३८ | प्रशांत श्रीकांत केंजळे |
| १९ | शुभांगी शालिग्राम सोनवणे | ३९ | सुहासकुमार कदम |
| २० | प्रशांत रामदास दहाट | | |

**तसेच वरील पात्र ठरलेल्या उमेदवारांनी यापुर्वी जाहिर सूचनेत मुलाखतीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या अटी/ शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.**

## पॅनवलवरील वकिलांना कराव्या लागणा-या कामासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. पॅनलवरील वकिलांनी महानगरपालिकेच्यावतीने या महापालिकेविरुध्द न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या दाव्यांचे, फौजदारी केसेस, अपिले यांमध्ये महानगरपालिकेतर्फे कामकाज पाहणे.
२. विहित मुदतीत महानगरपालिकेतर्फे दाखल दावा अथवा केसेसमध्ये वकिलपत्र, कैफियत, जवाब, प्रतिज्ञापत्र, कॅव्हेट दाखल करणे.
३. उल्हासनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकिलांना वर्ग करण्यात आलेली प्रकरणे/दावे/खटले स्वत: चालवायची आहेत. सदर वर्ग झालेली प्रकरणे/दावे/खटले त्यांना परस्पर अन्य वकिलांना वर्ग करता येणार नाही.
४. उल्हानगर महानगरपालिकेच्या संबंधीत विभागांकडुन प्राप्त झालेल्या प्रकरणांवर कायदेशीर विधिमत देणे.
५. न्यायालयीन प्रकरणांच्या व्यतिरिक्त करार, निविदा इत्यादी बाबत मसुदा तपासणे व कायदयानुसार अभिप्राय देणे.
६. न्यायालयात दाखल महानगरपालिकेंबंधित प्रकरणे/दावे/खटले संदर्भात पॅनलवरील वकिलांनी अतिशय गोपनियता बाळगणे आवश्यक आहे.
७. उल्हासनगर महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे पॅनलवरील वकिलांना बंधनकारक राहील.

८. ज्या दाव्यांमध्ये महानगरपालिकेच्यावतीने वकिल म्हणुन काम पाहत आहेत किंवा सल्ला देत आहेत अशा दाव्यातील अन्य पक्षकारास त्यांना सल्ला देता येणार नाही, अथवा अशा पक्षकाराची महानगरपालिकेविरुध्द असलेली प्रकरणे/दावे/खटले स्विकारता येणार नाहीत.

९. महानगरपालिकेच्या पॅनलवरील वकिलांना त्यांना वर्ग केलेल्या दाव्यांमध्ये मा. न्यायालयामार्फत पारित झालेले अंतरिम आदेश/निर्णय/हुकुम हे महानगरपालिकेच्या विधी विभागास वेळोवेळी कळविणे बंधनकारक राहिल, तसेच दाव्यातील अंतरिम आदेश/स्थगिती आदेश/निर्णय/हुकुम व इतर कागदपत्रे विधी विभागास वेळोवेळी उपलब्ध करुन देणे.

१०. महानगरपालिकेतर्फे वर्ग करण्यात आलेल्या दाव्यांची सदयस्थिती (सुनावणीच्या तारखा तसेच आदेश पारित असल्यास) प्रत्येक महिन्याच्या शेवटी अहवाल स्वरुपी विधी विभागास उपलब्ध करुन देणे.

११. महानगरपालिकेच्या पॅनलवर निवड झालेल्या वकिलांची नेमणूक प्रारंभिक काळ दिनांक 31 डिसेंबर 2025 पर्यंत असेल आणि त्यांना वर्ग करण्यात आलेल्या प्रकरणे/दावे/खटले मधील समाधानकारक कामगिरी असेल तर पुढील कालावधी वाढविण्याबाबत विचारात घेता येईल.

१२. पॅनलवरील वकिलांना वर्ग करण्यात आलेल्या, प्रकरणे/दावे/खटले मधील त्यांच्या कामगिरीच्या आधारे त्यांची नेमणूक कोणत्याही वेळेस संपुष्टात आणला जाईल. याबाबत मा. आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम राहिल.

१३. पॅनलवरील वकिलांना त्यांची फी (व्यावसायिक शुल्क) महानगरपालिकेतर्फे मंजुर असलेल्या दरानुसार अदा करण्यात येईल.

१४. फी (व्यावसायिक शुल्कांचे) दर हे सर्व शासकिय करांसहित असून प्रचलित शासन धोरणानुसार वजावटीस पात्र असेल.

१५. पॅनलवरील वकिलांनी महानगरपालिकेच्या दाव्यासंबंधी साप्ताहिक अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल.

१६. पॅनलवरील वकिलांनी न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा निकाल लवकरात लवकर लागणेसाठी सर्वोपरीने प्रयत्न करणे आवश्यक असून महानगरपालिकेच्या वतीने विहित मुदतीत व पूर्ण सामर्थ्याने बाजु मांडून महानगरपालिकेच्या बाजुने निकाल लावण्यासाठी प्रयत्न करणे बंधनकारक राहिल.

१७. पॅनलवरील वकिलांना त्यांना वर्ग करण्यात आलेली प्रकरणे/कामे ही त्यांना उचित/योग्य कारणांशिवाय नाकारता येणार नाहीत. वकिलांना वर्ग करण्यात आलेले प्रकरण/काम त्यांनी उचित / योग्य कारणांशिवाय करण्याचे नाकारल्यास सदर वकिलाची पॅनलवरील नेमणूक रद्द होण्यास पात्र राहिल. याबाबत मा. आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम राहिल.

१८. पॅनलवरील वकिलांना त्यांची शुल्काची देयके सादर करतेवेळेस त्यासोबत दाव्यातील रोजनामा, वकिलपत्र, आदेश आणि प्रकरणी मा. न्यायालयामार्फत वेळोवेळी झालेल्या आदेशांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

१९. मा. न्यायालयात महानगरपालिकेतर्फे दाखल करावयाचा दावा अथवा कैफियत/जवाब/प्रतिज्ञापत्र यांचा मसुदा दाखल करावयाच्या तारखेच्या किमान तीन दिवस आधी कळविणे आवश्यक राहिल.

२०. पॅनलसाठी निवड प्रक्रियेत रितसर सहभागी होणा-या वकिलांचाच पॅनलसाठी विचार करण्यात येईल.

२१. महापालिकेच्या वतीने वकिलांना देण्यात येणा-या दाव्याबाबत कोणास दावा दयावा याबाबतचा संपुर्ण अधिकार आयुक्तांकडे राहील आयुक्त जो निर्णय घेतील त्याबाबत कोणासही हरकत घेता येणार नाही.

२२. आकस्मितरित्या किंवा अतितातडीच्या कारणांस्तव देशातील कोणत्याही न्यायिक प्राधिकरणासमोर महानगरपालिकेची बाजु मांडण्याकरीता तत्कालिन परिस्थितीनुसार वकिल/सिनियर कांउसिलर नेमण्याचे व त्यांची फी अदा करण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

तरी प्रसिध्दी देण्यात आलेल्या दिनांकापासुन वरील अटी व शर्ती प्रमाणे 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरावर करारनामा बनवुन 10 दिवसाच्या आत विधी विभागात सादर करण्यात यावे.

(जमीर लेंगरेकर)
अध्यक्ष
अतिरिक्त आयुक्त (शहर)
उल्हासनगर महानगरपालिका